"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/८५.
पुणे, दि. १५।८।९५

प्रति,

BOOK-POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~माध्यमिक विद्यालय, अंबाडे~~
~~ता. भोर, जि. पुणे.~~

**विषय :-** नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.
सन १९९५-९६, इ. ~~६ वी~~, ~~७ वी~~, ९ वी, ~~१० वी~~.

आपल्या राजगड ज्ञानपीठ, भोर द्वारा संचालित माध्य. विद्यालय, अंबाडे ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/~~५ वी~~ चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(७०)नमाशा/मान्यता/नुवि/९४. दि. १९।७।९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ~~६ वी~~, ~~७ वी~~, ९ वी, ~~१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी ~~उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे~~/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात सांकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे. करिता.

आ.फा. ~~[illegible]~~
~~दि. ९।८।९५~~

"यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक
शिक्षण/माध्य/इ-४/प्रथम मान्यता/९६-९७
पुणे दि. २७/२/९७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माध्यमिक विद्यालय, आंबाडे, ता. भोर

विषय :- इ.१०वी वर्गास प्रथम मान्यता सन ९६-९७

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे
कडील पत्र क्रं. माध्य ३/प्रथम मान्यता/पुवि/ ९६-९७
दि.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या माध्यमिक विद्यालय आंबाडे ता. भोर या मराठी/~~इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९६ - ९७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.

३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथाची भर घालावी.

५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.

६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.

७] शैक्षणिक, कार्यानुभव, व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.

९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.

१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, महरा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.

११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.

१२] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.

१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी.. खाती उघडावीत.

१४] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात यावी.

१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे